## निशाणी क्र.२३ वरील आदेश

वादीतर्फे प्रस्तुत अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे वादपत्र दुरुस्तीकरीता दाखल करण्यात आलेला आहे.

०२. वादीतर्फे अर्जात असे नमुद करण्यात आले की, प्रस्तुतचा दावा दाखल करतेवेळी दाव्यात तुर्तातुर्त मनाई हुकुमाच्या अर्जामध्ये अनावधानाने व नजरचुकीने काही महत्वाचा मजकुर समाविष्ठ करण्याचे राहुन गेलेले असुन काही चुकीचा मजकुर समाविष्ठ करण्यात आला आहे, त्यामुळे अर्जात प्रस्तावित दरूस्ती मुळ दाव्यात व तुर्तातुर्त मनाई अर्जात करणे आवश्यक आहे, तसेच जर नमुद दुरूस्त्या केल्या तर दाव्याच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होणार नाही, याउलट प्रस्तावित दुरुस्त्या दाव्यात केल्या नाहीत तर वादीचे अपरिमीत नुकसान होईल. त्यामुळे प्रस्तावित दुरूस्त्या मुळ दाव्यात व तुर्तातुर्त मनाई हुकुमाच्या अर्जामध्ये करण्याची वादींना परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून योग्य तो आदेश करण्यात यावा अशी विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. ३ यांनी निशाणी क्र. २५ वर त्यांचे म्हणणे दाखल करून अर्जास विरोध दर्शवला आहे व असे नमुद केले आहे की, ज्या बाबी वादीने दाव्यात मान्य केलेल्या आहेत त्या बाबी वादींना दुरूस्तीद्वारे दाव्यातुन वगळता येवू शकत नाहीत, तसेच खरेदीदस्त क्र. ४२७/२०२४ बेकायदेशीर असल्याचे व वादीवर बंधनकारक नसल्याबाबत प्रस्तावित दुरुस्ती अनुशंगे दाव्यात कथन करत आहेत परंतु त्याबाबत आवश्यक ते न्यायालीयन शुल्का बाबत काहीही नमुद केलेले नाही, तसेच दावा उत्पत्तीच्या तारखेबाबत बदल करता येणार नाही, तसेच प्रस्तावित दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूप बदलते व सदर दुरूस्तीमुळे वादीचे नुकसान होणार आहे, सबब प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आलेली आहे.

०४. एकंदरीत अर्जाचे स्वरुप विचारात घेता खालील मुददे निर्माण होतात, त्यावर कारणांसह खालीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविण्यात येतो.

Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.01.09 17:57:33 +0530

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | वादीने मागणी केलेली प्रस्तावित दुरुस्ती दोन्हीं पक्षकारांमधील मुळ वाद अंतिमरित्या निर्णयीत करण्याकरीताआवश्यक आहे काय? | .... **होकारार्थी** |
| ०२. | वादीने मागणी केलेली प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपामध्ये बदल होतो काय? | ....**नकारार्थी** |
| ०३. | काय आदेश? | ..... **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**०५.** वादीतर्फे विदवान विधिज्ञ ***श्री. व्ही.सी.लाड*** यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. १ तर्फे विदवान विधिज्ञ ***श्री. आर.एन.घुले व प्रतिवादी क्र. ३ तर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एस.जी.कराड*** यांचा युक्तीवाद ऐकला.

**मुददा क्र. १ ते ३ करीता**

**०६.** एकंदरीत दोन्हीं बाजूंचा युक्तीवाद, अर्ज, म्हणणे व दाव्याचे अवलोकन केले असता या ठिकाणी नमूद करण्यात येते की, दावा हा स्थावर मिळकतीबाबत मालकी हक्क घोषीत करून चिरकाल मनाई हुकुम मिळणेबाबत दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरुस्तीचे अवलोकन केले असता वादी हे प्रस्तावित दुरूस्ती आधारे दाव्यात नमुद मिळकतीच्या क्षेत्राबाबत दुरूस्ती करत असल्याचे व दिनांक १८.०१.२०२४ रोजीचे खरदीखत क्र. ४२७/२०२४ वादीच्या हक्कावर बंधनकारक नाही अशी बाब व इतर काही अतिरीक्त मजकुर प्रस्तावीत दुरूस्ती अनुषंगे समाविष्ठ करू इच्छीत असल्याचे स्पष्ट होते. प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप विचारात घेता प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही हे निश्चित आहे. तसेच प्रस्तावित दुरुस्तीमुळे वादी दावा मिळकतीत बदल करत आहे असे देखील नाही, केवळ आणि केवळ दावा मिळकतीच्या

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.01.09 17:57:42 +0530

वर्णनाबाबत अधिक स्पष्टता यावी या उददेशाने अतिरिक्तचा मजकूर प्रस्तावित दुरुस्ती अनुषंगे वादी सामील करु पाहत असल्याचे दिसून येते, दावा हा अदयाप प्राथमिक स्थितीत आहे, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे पक्षकारामधील खराखुरा वाद सोडविण्याकरीता आवश्यक असणा–या दुरुस्त्या आवश्यकतेनुसार दाव्याच्या कोणत्याही स्थितीत मंजूर करता येत असल्याचे नमुद आहे. महत्वपूर्ण म्हणजे प्रस्तावित दुरुस्ती प्राथमिक स्थितीतील असल्याने उदारतेने विचारात घेणे आवश्यक आहे. तेव्हा अशा परिस्थितीत निश्चितपणे दाव्याचे स्वरुप विचारात घेता वादी व प्रतिवादीमधील खराखुरा वाद निर्णयीत करण्याकरीता, प्रस्तुत दाव्यातील वाद पूर्णतः व परिणामकारकरित्या सोडविण्याकरीता प्रस्तावित दुरुस्ती आवश्यक दिसून येते.

**०७.** प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये, मागणीमध्ये कोणताही बदल होत नाही. प्रस्तावित दुरुस्ती ही केवळ दाव्यातील मिळकतीच्या वर्णनाबाबत अधिक स्पष्टता यावी या उददेशाने दिसून येते, त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही व भविष्यातील हुकूमनाम्याच्यावेळी होणारी गुंतागूंत टाळण्याकरीता प्रस्तावित दुरुस्ती निश्चितपणे आवश्यक दिसून येते. दाव्याचा टप्पा विचारात घेता जरी अर्जात समर्थनीय कारण नमूद नसले तरी दुरुस्तीचे अर्ज उदारतेने विचारात घेणे आवश्यक आहे, फार फार तर अर्ज मंजूर करीत असताना योग्यतो खर्च आकारल्यास उददेश साध्य केल्यासारखे होईल व कोणावरही अन्याय केल्यासारखे होणार नाही. तेव्हा अशा परिस्थितीत दाव्याचे स्वरुप, दाव्यातील टप्पा, प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप, प्रस्तावित दुरुस्तीचे महत्व, दाव्याच्या स्वरुपात बदल होत नसल्याची बाब या सर्व बाबींचा सर्व समावेशकपणे विचारात घेता प्रस्तावित दुरुस्तीचा अर्ज न्याय दृष्टीकोनातून खर्चावर मंजूर करणे न्याययोग्य वाटते. सबब **मुददा क्र. १** चा निष्कर्ष "**होकारार्थी**" व **मुददा क्र. २** चा निष्कर्ष "**नकारार्थी**" नोंदवितो व खालील आदेश पारीत करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.01.09 17:57:49 +0530

## आ दे श

१) अर्ज निशाणी क्र.२३ हा रक्कम रु.१,०००/–(एक हजार) चे खर्चावर मंजूर करण्यात येतो. खर्च रक्कम वादीने पुढील तारखेस किंवा तत्पूर्वी प्रतिवादी क्र.३ यांना दयावी.

२) वादीस अर्जाप्रमाणे दाव्यात प्रस्तावित दुरुस्ती करणेची परवानगी देणेत येते. वादीने प्रस्तावित दुरुस्ती ही पुढील तारखेपासून १४ दिवसांचे आत करावी व दुरुस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर सादर करावी.

"**दावा येणेप्रमाणे पुढे चालेल.**"

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by SONTAKKE MAHAVIR BALIRAM
Date: 2026.01.09 17:57:57 +0530

(एम.बी. सोनटक्के)
दिनांक – ०९/०१/२०२६
२रे सह दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),
अंबाजोगाई